03-02-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 02/02/2025 11:32 PM Page 1



दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयाला सांडपाण्याचा वेढा पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



भारत सलग दुसऱ्यांदा अंडर-१९ महिला टी-२० विश्वविजेता पान ४ वर

वेर्णा, सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 152 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 3 February 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### तेलंगणात काँग्रेसमध्ये राजकीय भूकंप होणार ?

**हाद्राबाद, दि. २** :तेलंगणामध्ये काँग्रेस पक्षात अंतर्गत कलह सुरू असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. यादरम्यान आगमी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसच्या १० आमदारांनी एक गुप्त बैठक घेतल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे काँग्रेसच्या शीर्ष नेतृत्वाच्या चिंता वाढल्या आहेत. हैदराबादच्या बाहेरील गंडीपेट येथील आमदार अनिरुद्ध रेड्डी यांच्या फार्महाऊसवर बंद दाराआड चर्चा झाली. कंत्राटदारांनी केलेल्या कामाची बिले मंजूर करण्यासाठी लाच मागणाऱ्या दोन मंत्र्यांबद्दल चर्चा करण्यासाठी ही बैठक झाल्याचे सांगितले जात आहे. सध्या काँग्रेसमध्ये तेलंगणाचे माहिती व जनसंपर्क मंत्री पोंगुलेती श्रीनिवास रेड्डी (झेपर्सीश्रशींळ डीळपर्ळीरि ठशववू) यांच्या विरोधात विशेष पक्षांतर्गत नाराजी वाढताना दिसत आहे. यावेळी नैनी रेड्डी, भूपती रेड्डी, येन्नम रेड्डी, मुरली नाईक, कुचाकुल्ला रेड्डी, संजीव रेड्डी, अनिरुद्ध रेड्डी, लक्ष्मी राव, डोंथी रेड्डी, बीर्ला इलाह इत्यागी बैठकीला उपस्थित होते. यादरम्यान मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी पक्षातील वाढत्या असंतोषाच्या संदर्भात, विशेषत: पोंगुलेती श्रीनिवास रेड्डी यांच्याविरोधात पक्षाच्या कमांड कंट्रोल सेंटरमध्ये मंत्र्यांची भेट घेणार आहेत. या घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन पोंगुलेती यांनी त्याचा पालेर दौरा देखील रद्द केला आहे.

---

### नाशिक-गुजरात महामार्गावर अपघात; ७ जणांचा मृत्यू

**नाशिक, दि. २** : गुजरातमधील सापुतारा येथे नाशिक-गुजरात महामार्गावर एक खासगी बस २०० फूट खोल दरीत कोसळून भयानक अपघात झाला आहे. या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला, तर १५ जण गंभीर जखमी झाले. चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचे सांगितले जात आहे. पहाटे ४ वाजून १५ मिनिटांच्या सुमारास सापुतारा हिल स्टेशनजवळ बस चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला, अशी माहिती पोलीस अधीक्षक एस.जी. पाटील यांनी दिली आहे. अपघात झालेल्या बसमध्ये ४८ प्रवासी प्रवास करत होते. ही बस रस्त्याच्या कडेला लावण्यात आलेले बॅरिकेड्स तोडून खोल दरीत कोसळली, असेही त्यांनी सांगितले. वैभवी देशमुखचा नामदेवशास्त्रींना सवाल, माझ्या वडिलांवर झालेले वार, त्यांचं रक्त हे बसमधील ४८ भविकांना घेऊन बस नाशिकत्या त्र्यंबकेश्वरहून ुजरातमधील द्वारका येथे जात होती, यादरम्यान हा अपघात झाला.

---

### महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीमागे कट ?

**प्रयाग, दि. २** : उत्तर प्रदेश पोलिसांच्या स्पेशल टास्क फोर्सने प्रयागराज महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येला झालेल्या चेंगराचेंगरीच्या तपासाचा वेग वाढवला आहे. उत्तर प्रदेश एसटीएफचे पथक या घटनेमागे काही कट होता का या दृष्टीकोनातून तपास करत आहे. महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीमागे काही कट कारस्थान होता का, याचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तपासाचा एक भाग म्हणून, यूपी एसटीएफ संगम नाक्याभोवती सक्रिय असलेल्या १६ हजार मोबाइल क्रमांकांच्या डेटाची तपासणी करत आहे. चौकशीत असे दिसून आले आहे की, यापैकी बरेच क्रमांक सध्या बंद आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ हजारांहून अधिक मोबाईल क्रमांकांच्या डेटाचे विश्लेषण केले जात आहे. आतापर्यंतच्या तपासात, घटनेपासून अनेक मोबाईल क्रमांक बंद असल्याचे आढळून आले.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७ ↑ (२३१.१६ )

निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# पाईप लाईन फुटली! भाटलेत आला पूर!

## स्मार्ट सिटीच्या कामांचा सबंध नसल्याचे 'इमॅजिन पणजी'चे स्पष्टीकरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ : भाटले परिसरात सुरू असलेल्या सांडपाणी चेंबरच्या कामादरम्यान पाण्याची मुख्य पाईपलाईन फुटल्यामुळे रविवारी सकाळी १० वाजता धनलक्ष्मीनगर सोसायटी आणि आसपासच्या परिसरात अक्षरश: पुरपरिस्थिती निर्माण झाली. भाटले परिसरातल्या ७ ते ८ घरांमध्ये मोठया प्रमाणात पाणी भरल . यामुळे इथल्या रहिवाशांच्या गृहोपयोगी वस्तूंची मोठ्या प्रमाणात हानी झाली. जवळपास ३ तास ही घरे पाण्यात असतानाही 'इमॅजिन पणजी ' किंवा पणजी महानगरपालिकेचा कुणीही अधिकारी या भागात फिरकला नाही. त्यामूळे नागरिक संतप्त आहेत. या हलगर्जीपणाला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करा आणि आमची नुकसानभरपाई दया, अशी मागणी संतप्त रहिवाशांनी केली आहे. मात्र ही पाईपलाईन स्मार्ट सिटीच्या कोणत्याही कामामुळे लिकेज झाली नसलयाचे इमॅजिन पणजी ने म्हटले आहे. दरम्यान मुख्य पाईप लाईन फुटल्यामुळे लाखो लिटर पाणी वाया गेले असून ताळगाव आणि दोना पावला परिसरात पाण्याची टंचाई जाणवण्याची शक्यता आहे.**

शहराच्या जवळच असलेल्या भाटले परिसरात स्मार्ट सिटीच्या सांडपाणी चेंबरचे काम सुरू असताना रविवारी सकाळी या भागातून जाणारी ६०० एमएलडी मुख्य पाईप लाईन फुटली आणि बघता बघता धनलक्ष्मी नगर सोसायटीच्या आवारात पाणी भरण्यास सुरुवात झाली . थोडयाच वेळात या कॉलनीच्या बाजूला असलेल्या घरांमध्ये देखील पाणी भरण्यास सुरुवात झाली. रहिवाशांच्या लक्षात यायच्या आत पाणी घराच्या किचनमध्येही भरले . यामुळे अनेकांच्या घरातील मिक्सर . वॉशिंग मशीन, टेबलफॅन , फ्रीज इत्यादी उपकरणे पाण्याखाली जाऊन मोठे नुकसान झाले . त्यातल्या त्यात नागरिकांनी आपल्या वस्तू बाजूला करीत उर्वरीत हानी टाळली . जवळपास चार ते पाच तास हे पाणी भरलेले होते. या दरम्यान माजी नगराध्यक्ष उदय मडकईकर यांनी सबंधीत अधिकाऱ्यांपर्यंत हा प्रकार पोहोचवला. तरीही या भागात ना स्मार्ट सिटीचा कुणी अधिकारी फिरकला ना महानगरपालिकेचा . त्यामुळे इथले रहिवासी संतप्त आहेत. ऐन उन्हाळ्यात उद्भवलेल्या या पूरसदृश परिस्थिती मुळे झालेले नुकसान भरून दया आणि बेजबाबदार आणि हलगर्जी अधिकाऱ्यांवर कारवाई करा अशी मागणी इथल्या संतप्त नागरिकांनी केली आहे.





"स्मार्ट सिटीच्या एकाही कामावर त्यांच्या अधिकाऱ्यांची देखरेख नाही. खरं तर एसी केबिनमध्ये बसून लोकांचे हाल पाहणाऱ्या या अधिकाऱ्यांना अशा ठिकाणी आणून उभे केले पाहिजे आणि त्यांच्य बेफिकीरीमुळे लोकांचे हाल काय होतात ते त्यांना जाणवले पाहिजे. हजारभर कोटी रुपये खर्च झाले पण अजूनही स्मार्ट सिटीची कामे सुरूच आहेत. पणजी बुडते यावर अद्यापही त्यांना उपाय काढणे शक्य झालेले नाही. या निष्णात आणि क्वालीफाईड समजल्या जाणाऱ्या अधिकाऱ्यांचा काहीही उपयोग नाही.

– उदय मडकईकर (माजी नगराध्यक्ष)

"मी सकाळीच कामानिमित्त बाहेर गेले होते. मला शेजाऱ्यांनी फोन करून कळवले. मी घरी पोहोचेपर्यंत माझे किचन पाण्याने भरलेले होते. पाणी बाहेर जायला काहीच मार्ग नव्हता. असा प्रकार कधीच झाला नाही. मिक्सर, वॉशिंग मशीन फ्रीज पाण्याने खराब झाले आहेत.

– फरीदा (पिडीत नागरिक)

"रविवार असल्यामुळे आम्ही झोपलेलो होतो. अचानक घरात पाणी भरले, किचन पर्यंत भरले. घरातल्या वस्तु भिजून नुकसान झाले आहे. पण स्मार्ट सिटीचा कुणीही अधिकारी इथे आलेला नाही. हे पाणी गटारातून उलटे आल्यामुळे आम्हाला आता आजार होण्याची भीती आहे . महापालिकेने तातडीने यात लक्ष घातले पाहिजे.

– रेश्मा मकानदार (पिडीत नागरिक)

सकाळी दहा वाजता घरांमध्ये पाणी भरल्यापासून जवळपास तीन ते साडेतीन तास या भागात कुणीही फिरकले नाही, त्यानंतर या पाईपलाईन मधून सुरू असलेला पाणी पुरवठा बंद करण्यात आला. त्यानंतर बऱ्याच वेळाने सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता या परिसरात दाखल झाले. घटनास्थळाचा आढावा घेतल्यानंतर जेसीबी मशीनद्वारे पाईप लाईन नेमकी कुठे फुटली आहे हे शोधण्याचे काम सुरू झाले. फुटलेली पाईप लाइन ही ओपा पाणी पुरवठा प्रकल्पाची जुनी पाईप लाईन आहे, ज्या पाईपलाईन द्वारे ताळगाव आणि दोना पावला परिसरातील निवासी क्षेत्र आणि व्यवसायाना देखील पाणी पुरवठा होतो. हीच पाईपलाईन फुटल्यामुले रविवारी लाखो लिटर पाणी वाया गेले. त्यामुळे ताळगाव आणि दोना पावला परिसरात पाणी टंचाइ होण्याची भीती आहे. पाईपलाईन दुरुस्तीचे काम सुरू असून ते नेमके कधी पूर्ण होणार आणि पाणी पुरवठा कधी सुरळीत होणार याबाबत अधिकृत रित्या कोणीही कसलीही माहिती दिली नाही. पाईपलाईन दुरुस्त झाली तरी घरांमध्ये भरलेले पाणी ओसरण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे . शिवाय हे पाणी आजूबाजूच्या गटारातुन आल्यामुळे या भागात आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

### ही गळती स्मार्ट सिटीच्या कामांमुळे नाही : 'इमॅजिन पणजी'

भाटले परिसरात पाईपलाईन फुटून झालेली तात्पुरती पुरपरिस्थिती ही स्मार्ट सिटीच्या सुरू असलेल्या कोणत्याही कामामुळे झाली नसल्याचे ' आयपीएससीडीएल ' ( इमॅजिन पणजी ) ने म्हटले आहे. नागरिकांनी स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांवर संताप व्यक्त केल्यानंतर प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात इमॅजिन पणजीने म्हटले आहे की, इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेड स्पष्ट करते की भाटले येथे पाण्याची पाईपलाईन फुटल्याने पाण्याचा अपव्यय झाला आणि सखल भागात तात्पुरते पूर आले, हे स्मार्ट सिटीशी संबंधित कोणत्याही कामामुळे झाले नाही.धनलक्ष्मी कॉलनीमध्ये अंतर्गत पाईपलाईन एंड कॅम तुटल्यामुळे ही समस्या उद्भवली, जी पूर्णपणे असंबंधित बाब आहे. इमॅजिन पणजीने प्रभावित क्षेत्रात असे कोणतेही उपक्रम हाती घेतलेले नाहीत ज्यामुळे ही घटना घडली असेल.

# खनिज वाहतुकीचा तिढा सुटला !

## मात्र स्थानिक ट्रक चालकांची प्रायोगिक तत्वावर दहा दिवस होणार चाचणी :

## मूल्यमापनानंतरच पुढील बैठकीत होणार अंतिम निर्णय





■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २** : स्थानिक ट्रक चालकांना डावलून बाहेरील वाहतूकदारांना मये पिळगाव येथील खनिज वाहतूकीसाठी नेमणाऱ्या वेदांत कंपनीने अखेर ट्रक चालकांच्या दणक्यानांतर एक पाऊल मागे घेत ट्रक मालक संघटनेच्या मागण्या मान्य केल्या आहेत. त्यानुसार खनिज वाहतूक करण्याचे काम स्थानिक वाहतूकदारांनाच देण्याचे ठरले असल्यामुळे गेले आठ दिवस बंद असलेली खनिज वाहतूक सोमवारपासून पुन्हा एकदा सुरू होणार पान २ ▶

"कंपनीच्या म्हणण्याप्रमाणे १२ चाकी हेवी ड्यूटी ट्रक घ्यायचा झाल्यास आम्हाला तो टॅक्स भरून आणि इतर कामे करून वाहतुकीसाठी सज्ज करेपर्यंत ६५ लाख मोजावे लागणार आहेत, जे आमच्यापैकी कुणालाही शक्य नाही , कारण आधीच गेली बारा वर्षे कोणतेही काम नसताना आम्ही आमचे सहा चाकी ट्रक सुस्थितीत ठेवलेत. या ट्रकचे आम्ही काय करायचे ? याचे एकमेव कारण म्हणजे कंपनीला आम्हाला डावलून बाहेरचा ठेकेदार आणायचा आहे . परंतु तसे आम्ही होऊ देणार नाही.

– सतीश गावकर (अध्यक्ष ट्रक मालक संघटना)

"थ्री फोर्थ बॉटम वरुन जे रिजेक्शन वन टॉप पर्यंत नेऊन टाकायचे होते ते कंपनीने खेतान कंपनीच्या १२ चाकी ट्रक ना दिले होते . ते काम आता आमचे स्थानिक ट्रक चालकांना देण्यात येणार आहे. परंतु कंपनीने अशी काळजी व्यक्त केली आहे की , अंतिम खनिज वाहतूक आणि रिजेक्शन वाहतुकीचे काम ही दोन्ही कामे स्थानिक ट्रक वाहतूकदारांकडून वेळेत पूर्ण होणार नाहीत. म्हणून आम्ही दोन्ही आमदारांनी कंपनीला विनंती करून आमच्या स्थानिक ट्रक चालकांची या बाबतीत पुढचे दहा दिवस चाचणी घेण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार या संगळ्याचे मूल्यमापन होऊन दहा दिवसानंतर पुन्हा बैठक घेतली जाईल.

– प्रेमेंद्र शेट (आमदार, मये)

# कुख्यात गँगस्टर ग्योंग दिल्ली पोलिसांच्या स्वाधीन

**नवी दिल्ली, दि. २** :

पोलिसांसाठी मोस्ट वॉन्टेड असलेला आणि इंटरपोलच्या रेड नोटीसला सामोरे जाणारा गँगस्टर जोगिंदर ग्योंग उर्फ 'जोगा' याला रविवारी फिलीपिन्समधून दिल्लीला हद्दपार करण्यात आले, असे सीबीआयने म्हटले आहे.पानिपतमध्ये त्याच्याविरुद्ध दाखल झालेल्या गुन्हेगारी कट आणि हत्येच्या प्रकरणात जोगिंदर ग्योंग हा हरियाणा पोलिसांना हवा आहे.

इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरल्यानंतर त्याला दिल्ली पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले कारण तो येथील दलालाही हवा होता, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ने २५ ऑक्टोबर २०२४ रोजी इंटरपोलकडून जोगिंदर ग्योंगविरुद्ध रेड नोटीस जारी केली होती, जी जगभरातील सर्व कायदा अंमलबजावणी संस्थांना या वांछित गुन्हेगाराचा माग काढण्यासाठी पाठवण्यात आली होती, असे एजन्सीच्या प्रवक्त्याने एका निवेदनात म्हटले आहे.

रेड नोटीसच्या आधारे, आरोपी जोगिंदर ग्योंग याला फिलीपिन्समधून बँकॉकमार्गे दिल्लीला हद्दपार करण्यात आले, असे ते म्हणाले.हा आरोपी हरियाणा पोलिसांना हवा असलेला गुंड आहे ज्याने त्याचा गँगस्टर भाऊ सुरेंदर ग्योंगची खरी ओळख आणि स्थान पोलिसांना उघड केल्याचा संशय होता. पोलिसांशी झालेल्या चकमकीत सुरेंदर ग्योंग मारला गेला,असे निवेदनात म्हटले आहे.

सीबीआयने म्हटले आहे की, जोगिंदर ग्योंगने त्याच्या भावाच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी पीडितेची योजना आखली आणि त्याची हत्या पान २ ▶

# खबरदार आमच्या गावात प्रकल्प आणाल तर !

■ टीम दैनिक हेराल्ड

**मये, दि. २** : आधी आमचे जमीनीचे, शेतीचे, मालमत्तांचे प्रलंबीत प्रश्न सोडवा; तोपर्यंत गावात कोणताही प्रकल्प आणण्याचा विचार देखील करू नका असा सज्जड दम रविवारच्या ग्रामसभेत मये रहिवाशांनी राज्यकर्त्यांना भरला. मये येथे सरकारी जमीनीत आंतरराष्ट्रीय पातळीवरचे 'लॉ कॉलेज' आणण्याचा प्रस्ताव मये पंचयातीला सादर करण्यात आला आहे. हा प्रस्ताव रविवारच्या ग्रामसभेत चर्चेला घेण्यात आला. त्यावेळी या प्रकल्पाला उपस्थित रहिवाशांकडून शंभर टक्के विरोध झाला. त्यानंतर आक्रमक झालेल्या ग्रामस्थांनी जोपर्यंत मये गावातील जमीनीचे आणि सनदांचे प्रश्न सुटत नाहीत तोपर्यंत गावात कुठलाही प्रकल्प आणू नये असा ठराव घेतला आणि तो मंजूरही झाला.

प्रस्तावीत 'लॉ कॉलेजच्या' विषयावरुन रविवारची मये ग्रामसभा चांगलीच तापली. मये गावातील सरकारी जमीनीत आंतरराष्ट्रीय पातळीवरचे कायदा महाविद्यालय उभारण्याचा सरकारचा संकल्प आहे. तसा प्रस्ताव पंचायतीकडे दाखलही करण्यात आला आहे. मात्र ग्रामस्थांनी या प्रकल्पाला आतापासूनच ठाम विरोध करण्यास सुरुवात केली आहे.पंचायत सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या ग्रामसभेदरम्यान सरपंच कृष्णा

## मये ग्रामस्थांचा 'लॉ कॉलेज'ला कडाडून विरोध!



चोंडणकर यांनी हा प्रस्ताव उपस्थित ग्रामस्थांसमोर मांडला आणि याबतीत ग्रामस्थांनी योग्य तो निर्णय द्यावा असे आवाहन केले. यावेळी उपस्थित ग्रामस्थांपैकी संतोषकुमार सावंत महणले. मये गावातल्या बऱ्याचशा मालमतांचा प्रश्न अजून सुटलेला नाही, ही जमीन सरकारच्या ताब्यात असली तरी ती सरकारला हव्या त्या कारणांसाठी वापरता येणार नाही. आमच्या जमीनी आमच्या नावावर नाहीत आम्ही अद्यापही पारतंत्र्यातच जगतो आहोत. त्यामुळे या प्रकल्पाला आमचा विरोध आहे यावेळी झालेल्या वादळी चर्चेनंतर या ग्रामसभेत दोन ठराव घेण्यात आले. मालमत्ता प्रश्न जोपर्यंत निकालात निघत नाही तोपर्यंत गावात कोणताही प्रकल्प आणू नये असा ठराव राजेश कळंगूटकर यांनी मांडला. तर मये गावात कायदा महाविद्यालय प्रकल्पाला विरोध करीत असल्याचा ठराव संतोषकुमार सावंत यांनी मांडला. दोन्ही ठराव सर्वानुमते मंजूर झाले.

मये गावातील काहीच शेतकऱ्यांना त्यांच्या मालमत्तांच्या सनदा मिळाल्या आहेत. अनेकांना अद्याप सनदाच मिळालेल्या नाहीत. मालमत्ता नावावर नसल्यामुळे अनेक सरकारी योजनांचा लाभ या शेतकऱ्याना मिळत नाही. यासाठी गेली अनेक वर्षे इथले शेतकरी लढा देत आहेत. तशातच सनदा बहाल करण्याच्या विरोधात न्यायालयात देखील खटला सुरु असल्यामुळे या प्रक्रियेला विलंब होत असल्याचे म्हटले जातेय. अशा परिस्थितीत आम्हाला अधांतरी लटकवून ठेवत गावात नव्या प्रकल्पाची घोषणा करणे म्हणजे आमच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखेच आहे. परंतु हे आम्ही होऊ देणार नाही हे सरकारने लक्षात घ्यावे, असा कडक इशारा या ग्रामसभेत संतप्त ग्रामस्थांनी दिला.